# प्रकरण ३ रे

## 'आयदान' मधील अनुभवांची सामाजिकता

१) प्रस्तावना

२) 'आयदान' मधील आंबेडकरी विचारांचा प्रभाव

३) 'आयदान' मधील भुकेचे चित्रण

४) दलितांच्या प्रश्नांचा प्रभावी आविष्कार

५) स्त्री जाणिवेचं वेधक चित्रण

६) ग्रामीण जीवनाचे चित्रण

७) 'आयदान' मधील अस्पृश्यतेचं चित्रण

८) 'आयदान' मधील समाजचित्रण

९) 'आयदान' मधील समूहभावनेचे चित्रण

१०) 'आयदान' मधील सामाजिक प्रश्नांचे चित्रण

११) 'आयदान' मध्ये येणारे अंध:श्रध्देचे चित्रण

१२) 'आयदान' मधील स्त्री जीवनाचे चित्रण

१३) 'आयदान' मधील लैंगिक संबंधाचे चित्रण

१४) 'आयदान ' चे निवेदन आणि भाषा

१५) 'आयदान' मधील पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुद्धचा विद्रोह

१६) निष्कर्ष

१७) सारांश

१८) संदर्भ ग्रंथसूची

**प्रस्तावना :-**

साहित्य आणि समाज यातील परस्पर संबंधाचा विचार करताना साहित्य हे सामाजिक घडामोडींशी संबंधित असते किंवा नाही ? असल्यास ते कोणत्या प्रकारे असते ? समाजाशी संबंधित असलेले इतर विविध घटक आणि साहित्य हे समाजाशी एकच प्रकारे संबंधित असतात की त्यात कांही वेगळेपण आढळते ? यासारखे अनेक प्रश्न उपस्थित होतात. त्यांची आजवर विविध पद्धतीने आणि विविध पातळ्यांवरुन चर्चा होत आलेली आहे. परंतु याविषयी नि:संदिग्ध असे कांही सांगितले गेलेले नाही. याचे कारण साहित्य हे मुलत: बहुरुपी आणि बहुरंगी आहे. विशुद्ध भावगीतापासून एकांड्या प्रचारापर्यंत त्याचे अनेक समिश्र प्रकार आढळतात. साहित्याची निर्मिती आणि आस्वादन ही भिन्न भिन्न पातळयावरुन विविध प्रकारे घेतले जाते. शिवाय कार्यकारणाच्या भूमिकेवरुन साहित्याचा किती ही विचार केला तरी साहित्य ही वस्तुच तरल स्वरुपाची असल्यामुळे तर्काच्या पकडीत समाविष्ट न होणारे काही गुढ, गुंतागुंतीचे घटक साहित्य निर्मितीत राहतातच. आणखी असे की, निर्मिती आणि आस्वादन ही जी साहित्याची दोन अंगे आहेत. या अंगापैकी आस्वादन-व्यापाराशी समाजाचा जेवढा आणि ज्या प्रकारे संबंध येतो तेवढा निर्मिती व्यापाराशी येत नाही. या व्यापारात निर्मात्या कलावंत व्यक्तीला निर्णायक प्राधान्य द्यावयाचे की तो ज्या समाजात राहतो. त्या समाजाला ? त्या समाजाच्या सांस्कृतिक जडण-घडणीला ? त्या समाजाच्या जीवन दृष्टीला? असा प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होतो. त्यांची उत्तरे विविध प्रकारे दिली घेतली जातात.

''समाजशास्त्रीय भूमिकेवरुन साहित्याची पद्धतशीर पाहणी करण्याचा पहिला मान फ्रेंच समीक्षक व विचारवंत एच. ए.तेन यांच्याकडे जातो. त्याने १८६४ मध्ये

इंग्रजी साहित्याचा इतिहास लिहिला. १८७२ मध्ये त्याचे इंग्रजीत भाषांतर झाले. साहित्य समीक्षेचे काम, भोवतालच्या परिस्थितीचा आणि साहित्याचा अन्योन्य संबंध स्पष्ट करणे हे असते असे त्याने मानले. तेनच्या मते, कोणतीही साहित्यकृती घेतली तरी ती केवळ कल्पनांचा खेळ, किंवा उद्दीपित मेंदुतून निघालेली एक क्षणिक लहर असत नाही. ती लिहिणारा साहित्यिक ज्या समाजात वावरतो. त्या समाजाचा, त्याच्या देशाचा, त्या देशाचा इतिहास - भूगोल संस्कृतीचा, तो लेखक ज्या काळात जगला त्या काळातील गुणधर्माचा एक समयावच्छेदे करुन त्याच्या कृतीवर परिणाम होत असतो. आणि या सर्व घटकांचे परिशीलन केल्यानंतरच त्या कलाकृतीचे सम्यक दर्शन होऊ शकते.'' [१] हे गो. म. कुलकर्णी यांचे मत मनास पटते. साहित्य कृतीच्या एकंदर मांडणी - उभारणीवरुन व्यवस्थापनावरुन त्या त्या समाजाच्या मनाचा आपल्याला बोध होतो. असे तेन म्हणतो. साहित्य निर्मिती प्रक्रियेत समाज जीवनाचा प्रभावी भाग जरुर असतो. पण त्याचबरोबर तीत साहित्याची अशी एक खास पंरपरा ही असते. तिचा ही नवीन साहित्य निर्मितीवर फार मोठा परिणाम होतो. हे विसरून चालणार नाही. तेन ने साहित्य व समाज यातील संबंधाचा पध्दतशीर विचार सर्व प्रथम केला. हे निर्विवाद आहे. पण बरेचसे साहित्य प्रचलित साहित्य परंपरा, संकेत, रुढी यांच्या प्रभावातून निर्माण होते. ह्या सत्याकडे त्याचे दुर्लक्षच झाले आहे. 'समाज' ही जशी एक संस्था आहे. तशी 'साहित्य' ही एक समाजांतर्गत पण सापेक्षपणे स्वतंत्र अशी संस्था असते. त्या संस्थेचे नियम आशय-आकृती, बंदिशी, माध्यम, अविष्कार पध्दती हे घटक काही एका प्रमाणात स्वायत्तपणे प्रवर्तित झालेले असतात. त्यांचे आकलन करुनच साहित्यिक नवीन साहित्य निर्माण करीत असतो. त्याच्या निर्मितीवर या साऱ्यांचा कमी अधिक परिणाम घडत असतो.

साहित्य हे विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे अपत्य असते. मोती आणि शिंपला किंवा वनस्पती आणि जमीन यांच्या संबंधासारखा हा संबंध असतो. या तेनच्या विचाराचा पगडा या ना त्या स्वरुपात साहित्यकृतीवर कमी अधिक प्रमाणात पण सातत्याने पडत आलेला नाही.

दलित आत्मकथनातील अनुभव त्या एका व्यक्तीचा न राहता तो अनुभव त्या समाजाचा होऊन जातो. लेखिकेला येणारे अनुभव हे त्यांच्या वैयक्तिक चुकीमुळे अनुभवायला न येता ती लेखिका ज्या विशिष्ट जातीत जन्मला आली आहे. त्या अस्पृश्य जातीकडे इथली समाजव्यवस्था तुच्छतापूर्वक पाहण्याचे शिक्षण देते. इथली चातुवर्ण्यव्यवस्था माणसांच माणुसपण नाकारते. या नकारामुळे अनेक अस्पृश्यांची आयुष्येच्या आयुष्ये पूर्णपणे उद्धवस्त झाली आहेत. उच्च वर्णीयांनी लादलेल्या गुलामगिरीचा आलेख म्हणजे ही दलित आत्मकथने आहेत.

'आयदान'मध्ये उर्मिला पवार यांनी अस्पृश्य वर्गात जन्माला आल्यामुळे मला भोगायला मिळालेले अनुभव चित्रित केले आहेत. कोकण परिसरात असणाऱ्या समाज व्यवस्थेचं चित्रण येथे येते. कोकण परिसरातील महार समाजातील लोकांना तेथील सवर्ण समाज कशी वागणूक देतो. तसेच नोकरीसाठी मुंबईला आल्यानंतर ही जातीयता अस्पृश्यांचा पाठलाग सोडत नाही. राहण्याच्या जागेपासून ते इतर सर्व व्यवहार करताना येणाऱ्या जातीच्या अडचणीमुळे एकंदर सर्व दलितांची कशी कुचंबना होते. हे सगळे वर्तन त्यांच्या जगण्यावर कसे उठते. याचं चित्रण 'आयदान' मध्ये प्रामुख्याने उर्मिला पवार यांनी 'आयदान' मध्ये केले आहे.

'आयदान' मधील अनुभव विश्व एकट्या फणसावळे गावच्या विमलचे नसून त्या परिसरातील महार समाजातील स्त्रियांच्या जीवनाचे चित्रण आहे. या संदर्भात

लेखिका उर्मिला पवार आयदान मध्येच म्हणतात की, '' रत्नागिरीत घराजवळच्या उकिरड्यावर खेळाचे तुकडे गोळा करून ते चिंध्यांनी सांधणारी, सजवणारी मी, फणसावळ्यात बायकांच्या सोबतीनं त्यांच्या गप्पा गोष्टी ऐकत घाटी डोंगरातून, उन्हातान्हातुन पळसाची पानं पायाला बांधून धावणारी मी, आयेच्या धाकानं शाळा गाठणारी आणि पुढे संसाराची कसरत करत लेखणीच्या आधारानं आसवांना मागे लोटत पुढे जाण्याचा प्रयत्न करणारी मी ..........माझ्या आयुष्याचं हे 'आयदान' त्याची वीण वाचणाराला काय देणार आहे ? फार तर त्याला त्याच्या जगण्याची आठवण करुन देईल, किंवा एखाद्याला ते फेकुन द्यावं असं ही वाटेल, पण इथल्या प्रत्येक व्यक्तीच जगणं हे एक सामाजिक वास्तव आहे. एवढ्या दृष्टीन माझ्याही जगण्याकडे त्यानं पाहावं अशी अपेक्षा आहे.'' (२)

अशा पद्धतीने लेखिकेनेच आपल्या संपूर्ण पुस्तकात तिचा प्रत्येक अनुभव सामाजिक कसा झालेला आहे. हे सांगितले आहे. एकूणच आत्मकथनामध्ये चित्रित झालेले भुकेचे वर्णन, अस्पृश्यतेचे वर्णन, वेदनेचे वर्णन, विद्रोहाचे वर्णन, नकाराचे वर्णन, आत्मभानाचे चित्रण हे त्या एकट्या लेखिकेचे नसून संपूर्णपणे त्या समाजाचे असते. त्यामुळे 'आयदान' मधील वर्णन हे एका उर्मिला पवारांचे नसून कोकणातील स्त्री जातीचे आहेत.

## १. 'आयदान' मधील आंबेडकरी विचारांचा प्रभाव

सर्वच दलित आत्मकथनांच्या मधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, त्यांची चळवळ, त्यांच्या विचारांचा लेखकावर झालेला परिणाम या परिणामातून लेखकाची झालेली जडण-घडण,डॉ.आंबेडकरांनी उभारलेल्या संस्थामधून मिळालेले संस्कार समतेवर आधारलेला समाज उभारणीची तळमळ आदींचे उल्लेख आणि

दृष्टिकोन स्पष्ट होतात. उर्मिला पवारांच्यावरही आंबेडकरी विचाराच्या प्रभावांमुळे त्यांच्यात परिवर्तन घडले आहे. याचं वर्णन करताना, लेखिका लिहीते '' इथल्या संथ जगण्याला धर्मांतरानंतर बरीच गती आली''[(३)] धर्मांतरानंतर दलितांच्या जीवनात फार वेगाने परिवर्तन झाले, त्याचे आचार, विचार राहणी सर्वच बदलली आहे. लेखिका स्वतःच सांगतात की, चैत्यभूमीवरची ती सर्व पुस्तके, कॅसेटस् यांच्या वाचनान,ऐकग्याने माझ्यात आपल्या आपण परिवर्तन झाले.आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित झालेल्या अनेक प्रतिभावंतानी, विचारवंतानी त्यांच्यावर गीत लिहिली. त्यात त्यांचे विचार आहेत. ते ऐकूण अनेक दलित तरूण पेटून उठले. लेखिका आंबेडकरांनी दिलेल्या शिका या विचाराने प्रभावित होऊन संसार सांभाळत एम.ए. झाली. वेगवेगळ्या स्त्री मुक्ती तसेच जातीयतेच्या प्रश्नांच्यावर लढू लागली. आयदान मध्ये चित्रित झालेले बरेचसे संघर्ष डॉ. आंबेडकरांच्यामुळे आत्मभान आलेल्या एका दलित स्त्री कार्यकर्तीचे आहेत.

## २. आयदान मधील भुकेचे चित्रण

इथली व्यवस्था दलितांना धनसंचय करण्याचा अधिकार नाकारते. त्यामुळे इथले दलित माणसे कायमपणाने भुकेसाठी तडफडताना आपल्याला दिसून येतात.या भुकेसाठी मग त्यांच्याकडून लाजीरवाणी कामे करून घेतली जातात. या सामाजिक परिस्थितीच चेत्रण 'आयदान' मध्ये उर्मिला पवार करतात. सणाच्या वेळी सवर्णांच्या घरी पुरण-पोळीचे जेवण तर महारांच्या घरी वरण (पावटे) याचे जेवण असते. मग सणाच्या दुसऱ्या दिवशी सर्व महारणी गावात तो शिळा झालेला सण अगदी चढाओढीन मागायला जातात. याच वर्णन आयदान मध्ये येत. '' गस्ताली (गेल्यावर्षी) आमकी-तमकीच्या मिरच्यांना बायलीच कुंपान (कुंपन) मी एकट्यान

घालुन देलाय. तवा ती रांड माज्या हातावर मुतली सुदी नाय, पर आज मी त्येला सोडणार नाय, दोन तीन दिवसांना पुरल असं जेवण मी मागणार हाय ..... '' (४)
अशी मग कुणी मोलमजुरी केलेली असायची बांबुच्या टोपल्या, परड्या दुरडया करुन दिलेल्या असायच्या त्यांची परतफेड म्हणून उरल सुरलेलं आणायच असायचं ढोल वाजवणं, ढोर ओढणं, वर्दी देणं अशी म्हारकीची कामं करणारी घर हक्कानं मागायला जायची. सवर्णांच्या उरल्यासुरल्या जेवनाच्या आशेपाही इथला दलित आपल्या शरीराला पेलवणार नाही. अशी कामे करतो. पोटच्या भुकेची कायमच वणवण असलेले हे दलित या भुकेपायीच आपले जीवन खर्ची घालतात,व त्यामुळे ते स्वत:ची प्रगती करु शकत नाहीत.

रहायला घर नाही, खायला सरळ अन्न नाही. अशी उदाहरणे कमी अधिक प्रमाणात सर्वच दलिताच्या घरात दिसून येतात. चुकून एखादे वेळी एखाद्या सवर्णाने त्यांच्या कायमपणाने गोडधोड असणारे पदार्थ खायला दिले, तर मग यांना पराकोटी चा आनंद होतो. पण तो पदार्थ यांना घरात कसा करुन खायचा याच ज्ञान नसतं. कारण इतके चांगले पदार्थ वर्षानुवर्षे कधी त्यांच्या घरात शिजलेले नसतात. त्यामुळे त्यांच्या घरातील बाय ही हे पदार्थ कसे करायचे याविषयी अज्ञानी असतात. याचं चित्रण 'आयदान' मध्ये लेखिका करते. ''भाकरीसाठी मृत जनावरे आढणे, मृत जनावरांचे मांस खाणे, खोताकडे शक्तीपल्याडची कामे करणे, झाडलोट करणे आदीसह अनेक कामे अनिच्छेने भुकेचा प्रश्न सोडविण्यासाठी करावी लागतात. उत्सव समारंभासाठी होणाऱ्या जेवणावळीच्या वेळी कांही मिळेल या हेतुने तेथे दलित आत्मकथनामधून येणारे हे चित्रण ऱ्हदय पिळवटून टाकणारे आहे. '' (५)
अशा पध्दतीने आयदान मध्ये ही भुकेने तडफडणाऱ्या व अपरिहार्यपणे गुलामगिरी स्विकारावी लागणाऱ्या माणसांचे वर्णन येते. दलित समाजाची ही भूक सवर्ण समाजाने अनेक वर्षे झाली राखून ठेवली आहे.

## ३. दलितांच्या प्रश्नांचा प्रभावी आविष्कार -

'आयदान' या आत्मकथनामध्ये दलितांच्या प्रश्नाचा फार प्रभावीपणे आविष्कार केला आहे. दलितांना जिणे नकोसे करुन टाकणारी अस्पृश्यता, त्यामुळे त्यांची होणारी मानहानी मानसिक खच्चीकरण याच चित्रण येते. तसेच येथे प्रामुख्याने दलित स्त्रीयांच्या प्रश्नांचा फार प्रभावीपणे आविष्कार झालेला आपल्याला दिसून येतो. दलितांना जे विदारक दुःख भोगावं लागतं त्यापेक्षाही जास्त दुःख दलित स्त्रियांना भोगावं लागतं. हा मूलभूत प्रश्न घेऊन आयदान लिहिले गेले आहे. असे वाटते. हा प्रश्न संपूर्ण आयदान भर लेखिका आपल्या प्रतिभा सामर्थ्याच्या जोरावर अतिशय समर्थपणे मांडते. त्यामुळे या प्रसंगात कुठेही आक्रस्ताळेपण न येता संयमच राखलेला आपल्याला दिसून येतो. तसेच दलित चळवळीतील अंतर्गत फुटीचे वर्णनही पुस्तकाच्या उत्तरार्धात फार प्रभावीपणे केले आहे. दलितांच्या भुकेच्या प्रश्नामुळे त्यांना घासमोज्यांचे घर हे नाव कसे पडले. तसेच कोण भांडताहेत या प्रश्नाला नाही ते 'महार जेवताहेत' असे परिणामकारक म्हणी वापरुन लेखिकेने वर्णनात नेमकेपणा साधला आहे. अशा पध्दतीने दलितांना रोजच्या जीवनात भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांचे चित्रण 'आयदान' मध्ये येते.

## ४. स्त्री जाणिवेचे वेधक चित्रण

स्त्रीकडे असणारं मातृह्दय, जाणिवेची सृजनशिलता यामुळे ती पुरुषांपेक्षा श्रेष्ठ ठरते. उर्मिला पवार या हा अनुभव एक मुलगी एक पत्नी व एक आई या सर्व नात्यातून प्रवास करत चित्रण करतात. लेखिका लहान असताना तिचा भाऊ अच्युत आजार पणात मरतो. त्यानंतर तिच्या आईची होणारी अवस्था व लेखिकेचा पुलगा मंदार वारल्यानंतर लेखिकेला वाटणार साम्य लेखिकेने वर्णन केल आहे. स्त्रीदुःखाच

साम्य त्यांच्या जगण्याशी, भोगण्याशी असलेल आपल्याला दिसत. अच्युतच्या निधनानंतर तिच्या आईच्या रडण्यातील स्थर लेखिकेच्या खोल अंतरमनात जाऊन बसलेला आपल्याला दिसून येतो. ''तेव्हापासून माझ्या जाणिवेतल्या अगदी पहिल्या बिंदुशी मला आठवते. ती गोधडीच्या उबदार स्पर्शातली सकाळची गडद झोप.... नि त्या झोपेला फाडून अगदी काळजाला चिरत खोल खोल नेणिवेत उतरलेला माझ्या आयेच्या रडण्याचा स्वर......'' (६)

अशापध्दतीने स्त्री जाणिवेच वेधक चित्रण लेखिका करताना आपल्याला दिसते. लेखिका लहान असताना बालसदृश्य मानसिकतेतून येणारे अनुभव लेखिकेने अतिशय परिणामकारक रीतीने वर्णन केले आहेत. लहानपणी नकोसे वाटणारे व रक्षसासारखे वाटणारे वडील मोठेपणी मात्र हवेहवेसे वाटतात. स्त्रियांच्या अंगावर असगारं गोंदण हे खरतरं स्त्री गुलाम आहे. याच लक्षण आहे. परंतु पुरुष प्रधान संस्कृतीने त्यांना तुमच ते आभुषण आहे. असं सांगितल्यामुळे गोंदण अंगावर असण्याचा आग्रह त्या एकमेकीकडे धरतात. त्या बाबतीच्या भोळ्या समजुतीही त्यांच्यात आहेत. ते जर अंगावर नसेल तर देव स्वर्गात विचारतो की, गोंदुन आलीस का चोंदुल आलीस ? अशापध्दतीच्या अनेक चुकीच्या समजुती स्त्रियांच्यात पसरवून त्यांना जास्तीत जास्त ताब्यात ठेवले आहे. याच वर्णन लेखिका करते. त्यांना त्यांच्या गुलामीची जाणिव होवू नये यासाठी या पुरुषप्रधान व्यवस्थेने अगदी योग्य व्यवस्था केली आहे याचं चित्रण आयदान मध्ये येते.

## ५. ग्रामीण जीवनाचे चित्रण

दलितांनी व दलित साहित्याने जुनी धर्माधिष्ठित आणि मनुप्रणित विषमताधिष्ठित व्यवस्था नाकारली. 'माणूस' हेच मूल्य माणून समता,स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायावर आधारलेल्या समाजाची निर्मिती अपेक्षिली. रुढी - परंपरा नाकारुन नव्या समताधिष्ठित समाजाचे नवे तत्त्व त्यांनी अंगिकारले पण असे असले तरी दलित आत्मकथन लिहिणारे लेखक प्रायः खेड्यातून जन्मलेले, बालपण खेड्यात गेलेले आणि नंतर नागर जीवनाशी संबंध आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या आत्मकथनामधून पूर्वायुष्याचे येणारे चित्रण ग्रामीण जीवनाशी संबंधित राहिले. 'ग्राम' जीवनाचा मूलाधार शेती आहे. 'ग्राम' जीवनाचे सारे अनुभव या दलित आत्म कथनामधून येणे अपरिहार्य होते. त्यामुळे दलित आत्मकथनांमधून पाटील - कुलकर्णी, कारु - नारु, फिरस्ते - मागते आदींचे संबंध आले. आणि या संबंधामुळे 'मी'च्या भोवतालचे जग म्हणून त्यांचे चित्रण ही दलित आत्मकथनामधून आले आहे

''शेतकरी, शेती, जनावरे, गुराखी, शेतीची नानाविध औजारे, आदींशी संबंध आल्याने त्याचे दर्शनही दलित आत्मकथनांमधून येतेच पण, ग्रामजीवनातील लोकाचार आणि समाज व्यवस्था हे ही अपरिहार्यपणे चित्रीत होते. बलुते ते मागण्याचीरीत गावकी , गावकीची कामे, गावकीची काटी त्यामुळे निर्माण झालेले प्रश्न यासाऱ्यांचा ग्रामीण जीवनाशी संबंध आहेच. गावचा मांगवाडा, महारवाडा, चांभारवाडा आदीसह असणारी रचना आणि ही रचना सांभाळून जगणारी माणसं यांचे चित्रण दलित आत्मकथनामधून येते.'' [(७)] अशा पध्दतीने ग्राम जीवनांचे चित्रण आढळते.

फणसवळे गावातल्या रुढी-परंपरा प्रथा यांच चित्रण 'आयदान' मध्ये येत. तिथल्या खेडुत लोकांची अंध:श्रध्दाळू असणारी मानसिकता, त्यांचे अज्ञान याचा सगळे गैरफायदा घेतात. त्यांची केली जाणारी पिळवणूक याच यथार्थ चित्रण लेखिका आपल्या प्रतिभा सामर्थ्याच्या सहाय्याने करते.

## ६. 'आयदान' मधील अस्पृश्यतेचे चित्रण

दलित स्त्रियांच असणारं दु:ख उर्मिला पवार वर्णन करतात. इथल्या व्यवस्थेने एकूण स्त्रीयांच्या वाट्याला लहानपणापासून दु:खाचा भोगवटा दिलाच आहे. त्याच बरोबर दलित समाजातील स्त्रियां त्या दलित आहेत. म्हणून जास्तीचा भोगवटा त्यांच्या आयुष्याच्या वाट्याला येतो. त्याच चित्रण आयदान मध्ये येते. त्यांच्या फणसवळे गावातील स्त्रियांचे हाल होत. कारण त्यांचे हे गाव एकदम आडवळणी वसलेले होते. त्यामुळे चरितार्थ चालण्यासाठी त्यांना जंगलातून लाकडाची मोळी आणुन विकावी लागे. ती आणताना डोंगराचा चढ-उतार चढताना त्यांना जिणं नकोसे होई. तरी ही गावातील मराठा समाजातील स्त्रियां दलित स्त्रियांची सावलीही आपल्या अंगावर पडु नये याची काळजी घेतात. अस्वच्छ वागणाऱ्या सवर्ण स्त्रिया ही दलित स्त्रियांची सावली पडल्याने विटाळ होतो. या समजुतीने दूरुन व्यवहार करतात त्यामुळे या दलित स्त्रियांना खुप राग येतो.

मनुप्रणित व्यवस्थेने पोखरलेली माणसे मतीभ्रष्ट झाली तरी ही आपली व्यवस्था कशी टिकवून जगत असतात. लेखिकेची मोठी बहिण शांतीआक्का अत्यंत हालाकिच्या परिस्थितीत शिक्षण घेऊन एका वेड्याच्या हॉस्पिटल मध्ये नोकरीला लागते. तिथं असणाऱ्या वेड्या स्त्रियांना कशाची ही शुध्द नव्हती. पण जातीयता फक्त

त्यांच्या डोक्यात घट्ट रुतुन बसलेली होती. त्यामुळे ती नोकरीचा राजीनामा देण्याचा विचार करु लागते. अशा पध्दतीची अस्पृश्यता या अस्पृश्यांना भोगायला मिळते.

लेखिका तिचा लहानपणीचा एक अनुभव सांगते. आपल्या घरी नोकर असणाऱ्या पुरुषांबरोबर पळून आलेली एक मुस्लीम स्त्री लेखिकेची जात समजण्या अगोदर अतिशय चांगली वागत असते. परंतु जेव्हा त्या कुटुंबाला त्यांच्या पाहुण्या कडून लेखिकेची जात समजते. त्यावेळी अतिशय तुटकपणाच वर्तन ते कुटुंब लेखीकेशी करत. त्यामुळे लेखिकेच मन दुखवल जात याच वर्णन लेखिका करते. " अच्छा ' एवढंच म्हणाल्या नि निघुन गेल्या. माझ्या ते जिव्हाशी लागल रडायला ही आलं. " (८) अशा पद्धतीच कठोर वास्तव लेखिका मांडते.

## ७. ' आयदान ' मधील समाज चित्रण

कोणत्याही कलाकृतीमध्ये जाणिवपूर्वक समाज जीवनाचे चित्रण येत नसते, तर लेखकांचे संदर्भ समाजाशी असतात. त्यामुळे स्वाभाविकपणे समाजचित्रण घडत जाते. दलित आत्मकथनांमधूनही समाजाचे चित्रण अपरिहार्यपणे येते. धर्माधिष्ठित विषम समाज, त्या समाजाची आचार - विचाराची पध्दत समाजात असणाऱ्या श्रध्दा - अंध:श्रध्दा समाजच्या रुढी, रीतीरिवाज, समाजाचे दारिद्रय समाजाची अंतर्गतवीण आणि त्यातून येणारे एकसंघत्व विघटत्व अंतर्गत असणारे हेवेदावे, आदींचे चित्रण आत्मकथनामधून येते.

आयदान मध्ये येणारे समाजचित्रणही सुरुवातीला रत्नागिरी जिल्ह्यातील फणसवळे नावाच्या गावातील लोकांचे आहे. त्यांची दयनीय स्थिती तिथल्या श्रध्दा - अंधश्रध्दा, तिथल्या दलित पुरुषांचे होणारे हाल, स्त्रियांची होणारी पिळवणूक सवर्णांचा दलितांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन याचं चित्रण येतं.

कोकणातील महार समाजात असणाऱ्या भोळ्या समजूतींच्यामुळे त्यांची कशी आडवणुक होते. त्यांना कसे छळले जाते लोकांची अळुच्या पानासारखी फिदीफिदी असणारी भांडणे इथल्या प्रादेशिक वैशिष्टयांच्यामुळे कोकणी लोकांचा बनलेला स्वभाव या सर्वांचं चित्रण लेखिका आयदान मध्ये करते. या समाज चित्रणामुळे आयदानाच्या समाजचित्रणविषयक मूल्यमापनात मोलाची भर पडली आहे.

तसेच आयदानमध्ये जीवनातील दररोजच्या जगण्यासाठीचे संघर्ष करणारा समारंभादी मधील मानपान पाळणारा, देव-देवतांचे उत्सव करणारा, भुतबाधा,भाना-मतीसंबंधी अंधश्रध्दा बाळगणारा, अंत्यसंस्कारादी विधी करणारा, समाज आयदान या आत्मकथनात चित्रित होतो.

दलित आत्मकथनामध्ये स्वपेक्षा समाज चित्रणावर अधिक भर असतो. तो आपली न संपलेली जीवन गाथा सांगत असतो. त्यासोबतच आपल्या दास्याची मींमासा करतो. त्या दास्याविरुध्द संघर्षाची तयारी पातळीवर होण्याची परिवर्तनाची तयारी तो करीत असतो. वर्तमानांच्या साक्षीदारांकडून असे समाजाचे चित्रण अपरिहार्यपणे व्यक्त होते.

## ८. ‘आयदान’ मधील समूह भावनेचे आविष्करण

दलित साहित्याच्या एकूणच आविष्करणामध्ये व्यक्तीगत जाणिवांपेक्षा समूह भावना अधिक प्रमाणात व्यक्त होते. तेच दलित आत्मकथनामध्येही घडते. ‘मी व्यक्त होताना समूह ही येत राहतो. ‘दलित आत्मकथन हे एक,त्या एखाद्या विशिष्ट समाजाचे प्रातनिधिक कथन असते’. कारण आपल्या बरोबरच आपल्या समाजाचे बदलही त्याला सांगायचे असतात. ते त्याच्या लिहिण्याच्या ओघात प्रकटही होतात. ही भावना एखाद्या दुसऱ्या प्रसंगातून, घटनेतून लेखकाने रेखाटलेले असते, तर कधी

एखाद्या घटनेसंबंधाने भाष्य करताना व्यक्त केलेले असते. हे डॉ. वासुदेव मुलाटे यांचे निरीक्षण अत्यंत योग्य आहे.

"दलित आत्मकथनातील 'मी'च्या भोवती असणारा समूह आणि आत्मकथना मधील 'मी' यांचे विविध प्रसंगी घटनांच्या निमित्ताने येणारे संबंध आणि त्या निमित्ताने आत्मकथनांमधुन व्यक्त होणारा समूह या आत्मकथनाचा विशेष आहे. समुह मनाची भावना सर्व आत्मकथनामधून व्यक्त होते." (९) अस्पृश्यांवरील अन्याय-अत्याचाऱ्याला सीमा नाहीत. पोटाची आग संपत नाही, समाजाचा अत्याचार संपत नाही. तरीही दलितांनी बिनबोभाट जगायचे, अन्यायाला शरण जायचे आणि अत्याचाराला सहन करायचे ही कोकणातील अस्पृश्यांची रीत होऊन बसली आहे. त्याचे यथार्थ दर्शन 'आयदान' या आत्मकथनामधून प्रकट झाले आहे. लेखिका उर्मिला पवार यांनी कोकणातील एकूण महार समाज जाती व्यवस्थेखाली भरडला जातो हे सांगण्यासाठी त्यांनी सवर्ण स्त्रिया सोवळे कसे पाळतात, हे सांगितले आहे. तसेच सवर्णाच्या होळीच्या सणात महारांच्या होळीच्या सणातील फरक, तसेच एकुण स्त्री जातीवर अन्याय होतानांही सर्व कशा निमुटपणे सहन करतात. त्यामुळे वर्षानुवर्षे या व्यवस्थेने त्यांच केलेल मानसिक खच्चीकरण या सगळ्याच वास्तव चित्रण 'आयदान' मध्ये चित्रीत झाला आहे.

## ९. सामाजिक प्रश्नांचे चित्रण

'आयदान' मधून समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या सामाजिक प्रश्न अभिव्यक्त झाले आहेत. जे अनुभवायला लागले. त्याचे चित्र निर्भिडपणे, प्रामाणिकपणे प्रकट झाले आहे. जातीय व्यवस्थेने एका समाज जीवनाचे केलेले वाळवंट विमलच्यारुपाने 'आयदान' मध्ये भेदकपणे उभे करण्यात उर्मिला पवार यशस्वी ठरल्या आहेत.

तसेच त्या त्या विशिष्ट कठीण व भीषण परिस्थितीवर मात करण्यातही यशस्वी ठरल्या आहेत. गावांने महारांना कवडीची किंमत दिली नाही. माणसाच्या रुपाने वागविले नाही, तिथ कसलं प्रेम नाही. दलितांनी आलेल्या संकटाला सतत सामोरे जाणे .हे सहन केल्याशिवाय गत्यंतर नाही. अशी त्यांची मानसिकता करुन दिली आहे. समाजातील जातिव्यवस्थेने लेखिकेच्या वाट्याला आलेले दु:ख हे दारिद्रय आणि अस्पृश्यता या मानवनिर्मित आणि मनुप्रणित व्यवस्थेतून आले आहे. वेदना आणि दु:ख यांनी हे दलितांचे जीवन खच्चुन भरलेलं आहे. किंबहुना याशिवाय वेगळे त्यांच्या जीवनात काहीच नाही. इतके विदारक आणि दाहक आहे.

संवेदनाहीन झालेल्या व्यवस्थेने समग्र दलित समाजाचे जीवन अमानुष प्रथा, परंपरांनी संपवून टाकले आहे. धर्मांतरानंतर महारांनी जुनी कामं करण्याचं सोडून दिले त्यावेळी ते त्यांना त्रास देवू लागले. तेव्हा प्रतिकारशून्य एक महार बोलतो, '' तं माला कलताय...... मी काय खुला न्याय हाय....... तु मला अगदी बामनासारखा सांगतोस हाय ता........ मराठं तालेवार हायतं त्यांना दंड लावता यनार हाय.'' (१०)

जातीच्या उतरंडीमध्ये गावकुसाबाहेर राहिलेल्यांनी सवर्णीयांची सेवा करायची, त्याचा मोबदला ही मागायचा नाही. उत्पन्नाची सगळी साधने सवर्णीयांच्या हाती आहेत. त्यामुळे अस्पृश्यतेच्या शापित जीवनाबरोबरच आर्थिक दैन्य आहे. सांस्कृतिक, आर्थिक जीवन अनंत प्रश्नांनी व्यापून गेले. या सर्व प्रश्नामुळे जे जीवन जगावे लागलेत्या जाणिवा 'आयदान' मधून प्रकट झाल्या आहेत.

## १०. 'आयदान' मध्ये येणारे अंधश्रध्देचे चित्रण

दलितांच्या शिक्षणाला अनेक वर्षे बंदी होती. त्यामुळे हा समाज वर्षानुवर्षे अज्ञानाच्या अंधकारात वावरत होता. अंधश्रध्दा व भोळ्या समजुतींना बळी जाऊन अनेक पध्दतीने त्यांचे नुकसान ही होत आले आहे. अज्ञानामुळे अनेक पध्दतीच्या वाईट चालीरीती दलितांच्यात वर्षानुवर्षे चालत आलेल्या आहेत. आयदानमध्ये अशा प्रकारच्या पध्दतीच वर्णन प्रामुख्याने येत.

फणसवळे गावच्या स्त्रिया लाकडाच्या मोळ्या विकून, आपला चरितार्थ चालवण्यासाठी संसाराला मदत करीत असत. या मोळ्या आणण्यासाठी त्यांना खूप दूर चालत जाव लागत असे. त्यावेळी त्यांच्यात असणाऱ्या एखाद्या लहान मुलाच्या आईला तिच्या मुलाची आठवण होत असे. तिला पान्हा, फुटत असे. मग तिची मैत्रीण तिला सांगते की, '' तं तुजं दुद गलताय ना..... तं जमनीवर सांडु नुको, मुंगल्यानी खल्लानी तं दुद आटल, म्हणुन पानात घे हां, हे घे पान नि तं दुद झाडाच्या मुदात सोड, म्हजे दुद वाडंल.'' (११) अशा पध्दतीच्या अज्ञानामुळे आलेल्या भोळ्या समजूती दिसून येतात. तसेच भुताखेतांच्या अंधश्रध्देन निर्माण झालेल्या समजुती ही दलितांच्यात असलेल्या आपल्याला दिसुन येतात. होळीच्या सणाच्यावेळी एक प्रथा, म्हणुन म्हारांना वाईट शिव्या देण्याची प्रथा असलेली आढळून येते माणूस देवाच्या कोपामुळे आजारी पडतो. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने देव-देवतांचेही चातुर्वर्ण्य करुन टाकले आहेत. या संदर्भाने 'आयदान' मध्ये आलेले अनुभव मजेशीर आहेत. अनेक [illegible] अंधश्रध्दा व भोळ्या समजुती यामुळे कोकणातील महार समाज कसा वाईट स्थितीत जगतो आहे. याचं चित्रण लेखिका उर्मिला पवार यांनी आयदान मध्ये केले आहे.

दु:ख यातनांचे ओझे घेऊन जीवनभर हाल अपेष्टा, उपेक्षेच्या खोलवर झालेल्या जखमा सहन करीत दलित माणसे जगत असतात. शिक्षण नाही, जगात थारा नाही, दारिद्रय पाठ सोडत नाही. यामुळे दलितांचे अंधाराचे जीवन संपत नाही त्यातच या समाजात कमालीच्या अंधश्रध्दा आहेत. रुढी-परंपरांचे पालन बिनतक्रार करावे लागते. यातुनही जीवनाला अवकळा येते. याचे चित्रण आयदानमध्ये प्रामुख्याने आलेले आहे.

## ११. स्त्री जीवनाचे चित्रण

दलित स्त्री जगताना ती आई, पत्नी, बहिण अशा नानाविध नात्यांच्या अनुबंधनातून जगते. जगताना तिच्या वाट्याला कष्टाशिवाय फारसे काही येत नाही. आळशी, वेंधळ्या नवऱ्याच्या किंवा वैधव्यात आपल्या संसाराचा गाडा हिंमतीने ओढणाऱ्या स्त्रियांच्या कष्टाला सीमा राहत नाही. मुळातच दलितांचे जीवन दु:खाचे, कष्टाचे, यातनांचे असते. त्यातही दलित स्त्रियांचे जीवन अधिकतम यातनांचे बनते. मुकेपणाने सारे सहन करीत ती जीवनाला सामोरे जाते. याचे चित्रण दलित स्त्री आत्मकथन आयदानमधून व्यक्त होते. या पुस्तकात स्त्रियांच्या येणाऱ्या समस्या, कोण्या एकट्या स्त्रिच्या नसून एकूण सर्व स्त्रियांच्या दु:खाची गाथा त्या सांगतात, जुलै २००४ च्या 'ललित' मध्ये मानाचे पान या सदरात, डॉ.गंगाधर पानतावणे म्हणतात ''पारदर्शित्व' हे 'आयदान' चे वैशिष्टय पुर्वार्धातील नातीगोती, दारिद्रय, चालिरिती, रुढी, पंरपरा, जातीयतेचे हिंसक अनुभव, भटशाहीचं प्रस्थ, ब्राम्हणी हस्तक्षेपाला विरोध करणारी नवी सुधारकी वृत्ती, दलितांची जीर्ण मानसिकता, उर्मिला पवारांनी विलक्षण ताकदीनं चितारली आहे. त्यात आक्रस्ताळेपणा किंवा दंश नाही तर वास्तवाचा आणि जीवनसत्याचा शोध जाणवतो.'' [१२]

'आयदान' हे पश्चिम महाराष्ट्रातल्या दलित जीवनाचे दर्शन घडवणारे महत्व पूर्ण आत्मकथन आहे. कोकणातील दलित जीवनाची नव्यानेच ओळख करुन देणारं आत्मकथन म्हणून ही याचे वेगळेपण नजरेत भरते. इथे प्रामुख्याने खडतर कष्टमय दलित स्त्री जीवनातील वेदना, शिक्षणाअभावी मागसलेपण आंबेडकरी चळवळीचा प्रभाव, धर्मांतर याबरोबरच शिक्षणांमुळे लेखिकेच्या स्त्री जाणिवेत झालेली वाढ त्यातून स्वकियांच्या व परकियांच्या विरोधाला न जुमानता लेखिकेने केलेले स्त्री मुक्ती विषयक कार्य यांचा ही या आत्मकथनात आविष्कार झालेला आहे. दलित मुक्ती चळवळीत स्त्री प्रश्नांना थारा नव्हता आणि स्त्रीमुक्ती चळवळ दलित मुक्तीकडे उदासिनतेनं पाहत होती. आज ही त्यात फरक पडलेला नाही. अशा प्रकारच्या जाणिवाचं चित्रण येथे येते.

पुरुषांनी चालविलेल्या शोषणाचे चित्रण करताना आयदान मध्ये लेखिका अनेक प्रसंगाचे वर्णन करते. एकदा लेखिकेचा शांताराम नावाचा एक नातेवाईक बायकोला खूप मारतो व गावात सांगत जाता की, ''तिकड आमच्या खल्यात मी बकरी कापल्याय.... कुणाला रक्ती हवी आसलं तर घेऊन जा |'' [१३] स्त्री ही आपली आजन्म गुलाम आहे. अशाप्रकारचे वर्तन इथले पुरुष स्त्रियांशी करतात. या विषयी डॉ. गिरीश काशीद म्हणतात, '' आयदान मात्र एक दलित नारी का आत्मकथन नही. अपितु इसमें कई नारियों के जीवन का प्रतिनिधीत्व करने की क्षमता हैं |इसमे लेखिका के साथ या बराबर कई स्त्रिया आपनी व्यथाओं की गठरिया खोल देती है |'' [१४] कित्येक स्त्रियांच शोषण इथली मनुप्रणित समाजव्यवस्था करताना आढळते. लेखिकेने ऐकलेली एक कथा लेखिका सांगते. गर्भवती राहिलेल्या एका महिलेला तिचा गर्भपात होईपर्यंत ओनवी करुन तिच्या पृष्ट भागावर लत्ताप्रहार

करण्याची शिक्षा तिथली पंचायत देते. अशा प्रकारचे घोर अन्याय स्त्रियांच्यावर वर्षानुवर्षे होत आहेत. याविषयी गंगाधर पानतावणे म्हणतात, ''सतत अस्थिर जीवनाचा सामना स्त्रिया करत राहतात. कधी कधी चारित्र्याच्या संशयावरुन ही नवरा तिला छळतो. तिच्या चारित्र्याचे धिंडवडे भावकीत जात पंचायतीत काढले जातात. तिचे जगणे यामुळे मुश्किल होते. लेखीकेने सांगितलेला विधवेला दिवस गेल्याचा प्रसंग मोठा विदारक आहे. न्याय-निवाडा करणाऱ्या जात- पंचायतीतील महाल कऱ्यांनी त्या विधवेचा गर्भपात होईपर्यंत तिच्या पार्श्वभागावर लाथा मारण्याची शिक्षा दिली.''[१५] व्यवस्थेने स्त्रियांच्या शोषणाचा अधिकार पुरुषाला दिला आहे. त्यामुळे स्त्री ही आपल्याला निसर्गानेच वापरण्यासाठी दिलेल जनावर आहे. अशी पुरुषांची मानसिकता झाली आहे. अशा पध्दतीन तिच्या मनाचा, भावनेचा विचार न करता इथला पुरुष तिच्याशी वर्तन करतो.

## १२. 'आयदान' मधील लैंगिक संबंधाचे चित्रण

स्त्रियांचे वर्षानुवर्षे कसे लैंगिक शोषण चालले आहे. याच चित्रण प्रश्न रुपान आयदान मध्ये येत. 'भुत विशेषत: स्त्रियांना धरायची यासारखी सुचकता स्त्रीच्या लैंगिक शोषणाचे चित्रण करते'. लेखिकेची एक नातेवाईक लैंगिकतेच्या अपुऱ्या ज्ञानामुळे नवऱ्याला सोडून घरी येऊन राहते. याच चित्रण येते. तसेच अनेक स्त्रियांच लैंगिक शोषण समाजात वारंवार चाललेल असतं. काही ठिकाणी नात्यंची तमा न बाळगता ही लैंगिक शोषण केल जात याचं वर्णन येत. लेखिकेने आपले व आपल्या पतीच्या लैंगिक जीवनाचे चित्रण केले आहे. एकूणच आयदान मधील लैंगिक संबंधा- विषयी डॉ.विलास थोरात म्हणतात, ''आयदान' तील लैंगिक संबंध बरेचसे बटबटीत आणि रंजकतेने रेखाटलेले दिसते''. दलित आत्मकथनावर केल्या जाणाऱ्या

अनेक आरोपापैकी 'लैंगिकतेचे भडक चित्रण' हा एक आरोप होय. अर्थात लैंगिक चित्रणाची अपरिहार्यता लक्षात न घेता. केला गेलेला असा आरोप एकांगी ठरतो. परंतु केवळ भडकपणा निरंजकता, यांना अनुसरुन केले गेलेल लैंगिकतेचे चित्रण समर्थनिय ठरु शकत नाही. 'आयदान' त लेखिका लैंगिक चित्रणा संदर्भात बरीच वाहत गेलेली दिसते. बैलाचा अंडकोश ठेचण्याचा प्रसंग लेखिका 'हळद - लोणी' लावून सविस्तर पणे सांगते मात्र पुढे लेखिका बैल ठेचण्याचा हा प्रकार, बलात्कार करणाऱ्या पुरुषां संदर्भात निर्देशित करुन आपली स्त्रीवादी जाणीव प्रकट करताना वापरते. लेखिका वयात आल्यानंतर आलेल्या मासिक पाळीचे चित्रण भडकपणे करते. हनीमुन नंतर दुसऱ्यांदा सासरी भिरवंडीला साजरा केलेला हनीमुन ही लेखिका आपल्या कोरेपणाची साक्ष देण्यासाठी कथन करते. एकूणच लैंगिक संबंधाची रसभरीत चर्चा करणे म्हणजे 'आयदान' त लैंगिक संबंधाना रंजक बनवल्या सारखे वाटते. तसेच 'उलगव्वा' नावाच्या कोमट्याच्या पोरीबरोबर क्रियाकर्म करणारा पुजारी.'' (१६) अशा पध्दतीची चित्रणे आयदान मध्ये अपरिहार्यपणे येतात. त्यामुळे लैंगिकतेचे आयदान-वरील आरोप समाजात वाढलेली लैंगिकता आणि उघड उघड चालणारी भयानकता याचा विचार करता हे चित्रण कांही चुकीचे वाटत नाही. समाजात जागोजागी स्त्रिचे लैंगिक शोषण वेगवेगळ्या मार्गांनी केल जात असत. याच प्रातिनिधीक चित्रण करण्याच काम 'आयदान' मध्ये केलेलं आहे.

# १३. आयदानचे निवेदन आणि भाषा

भाषा प्रत्येकाचे व्यक्तित्व, त्या व्यक्ती मनाचे, व्यक्ती वापरत असलेल्या समाज मनाचे आणि समाज ज्या परिसरात राहतो. त्या परिसराचे साकार रुपच असते. दलित आत्मकथनांची भाषा त्या त्या भौगोलिक परिसराचे आणि लेखक ज्या समाजात वाढला वावरला त्या समाजाचे प्रतिनिधित्व करीत असते. भाषेव्दारा त्या त्या समाजाची संस्कृती त्याचे विचार विकार, त्यांची वृत्ती-प्रवृत्ती व्यक्त होत असते. दलित आत्मकथनांमधून येणारी भाषा प्रत्येक लेखकाचे वेगळेपण सांगणारी आहेच पण त्या सोबत त्या त्या भौगोलिक परिसराची लोक व्यवहाराची अभिव्यक्ती भाषेव्दारे होते. त्या परिसरातील वाक्प्रचार, म्हणी, सुभाषितांचा उपयोग गतिमान निवेदनासाठी केला गेला आहे.

आत्मकथनांची निवेदन शैली लेखकाच्या व्यक्तीमत्वानुरुप बदलते आणि स्वाभाविक ही आहे. लेखकाच्या भाषेचे, बोलीचे परिणाम निवेदनास लाभते. साहित्य निर्मितीच्या प्राक्रियेत लेखकाच्या व्यक्तीमत्वाचे स्थान अनन्यसाधारण असते. अभिव्यक्त होणारा आशय आणि लेखकाचे व्यक्तीमत्व यांचा अतिशय निकटचा संबंध असतो. हा फरक केवळ त्यांच्या मनोवृत्ती मधील व्यक्तीतील अनुभव घेण्याचा व तो व्यक्त करण्याचा पध्दतीतील फरक असतो. त्यामुळे लेखनाचे स्वरुप भिन्न होण्यामागे त्या प्रत्येकाच्या व्यक्तीमत्वाचे 'पृथगत्व' हेच कारणीभूत असते. प्रत्येक दलित आत्मकधनांची शैली वेगवेगळी आहे. प्रत्येक आत्मकथनांच्या लेखकाची शब्द आणि अर्थ यांची योजना करण्याची पध्दत भिन्न भिन्न आहे ही पध्दती भिन्न भिन्न असते. हा सार्वत्रिक अनुभव आहे.

'आयदान' मध्ये वापरलेली भाषा ही अशाच पध्दतीने अनुभवांच्या सार्वत्रिकतेचा अनुभव देते. रत्नागिरी या कोकणी प्रदेशातील 'महार' या विशिष्ट जातीची बोली आयदान मध्ये येते.कोकणी प्रदेशातील भौगोलिक वैशिष्टयता, सांस्कृतिक वैशिष्टयता या भाषेला चिकटलेली आहे. वर्षानुवर्षे गुलाम राहिलेल्या महार समाजाची ही बोली आहे हे जाणवते.

## १४. पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुध्दचा विद्रोह

लेखिका उर्मिला पवार यांनी पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुध्दचा विद्रोह पुकारलेला दिसतो. अनेक वर्षे मनुप्रणित समाज व्यवस्थेत स्त्रिला गुलाम ठरवलेले आहे. त्यामुळे तिचे माणूसपण समाजव्यवस्थेने हिरावून घेतलेल आपल्याला दिसून येतं. समाजातील कोणत्याही वर्गातील स्त्री असु दे किंवा समाजातील कोणत्याही जातीतील स्त्री असु देत ती त्या त्या समाजाच्या पुरुषांची दासीच असते. या अखंड गुलामगिरी विरुध्द लेखिका पवार विद्रोह पुकारतात या गुलामीला त्या नाकारतात माणूस म्हणून सर्वांना समान लेखण्याचा आग्रह धरतात.

स्त्रिला गुलाम म्हणून पुरुषसत्ताक व्यवस्था वापरते. या गोष्टीला विरोध करताना मात्र काही ठिकाणी लेखिका फक्त व्यवस्थेला विरोध करायचा म्हणून करते एक माणूस म्हणून ती आपल्या जोडीदाराकडे पाहताना दिसत नाही. आपण ज्या समाजात जगतो तिथल्या व्यवस्थेचा विचार हे ठिक आहे. परंतु हरिश्चंद्र उर्मिलाशी एक माणूस म्हणून वागत असतानाही पुरुषव्यवस्थेविरुध्दचा राग ती हरिश्चंद्रवर वारंवार उगारताना दिसते. काही ठिकाणी आपले मोठेपण सिध्द करण्यासाठी हरिश्चंद्राला प्रमाणापेक्षा जास्त दुय्यम दाखवलेला आहे. त्याला तिच्या या सर्वांबद्दल

काय वाटते याची चर्चा न करता लेखिका व्यवस्थेविरुध्दचा विद्रोहकरता हरिश्चंद्राच्या मानसिकतेचा काही ठिकाणी कोंडमारा होतो की काय असे वाटत राहते.आपल्या हेकट स्वभावामुळे, हरिश्चंद्र एक माणूस म्हणून काही दु:खांना सामोरा गेला असेल की नसेल यांची चर्चा करताना लेखिका कुठेही आपल्याला दिसत नाही. तिच्या मते तो फुले आंबेडकरी चळवळीतील काही पुरुष माणूस म्हणून माझ्याशी वागत नाही. तर एक पुरुष म्हणून वागतो स्त्रियांना दुय्यम लेखतात. या भावनेत पछाडलेली लेखिका याच प्रातिनिधिक रुप म्हणून हरिश्चंद्रच वर्णन करताना आयदान मध्ये वारंवार दिसते. ''एम.ए.ला. दुसऱ्या वर्गात पास झाले, पण त्याचं फारसं काही माझ्या पतीला मिस्टर पवारांना वाटलं नाही . मित्रांना मात्र 'आता ती एम. ए. झाली' हे ते न चुकता सांगत होते. त्यांनीच फ्रेम करून भिंतीवर टांगलेल बी. ए. च सर्टिफिकेट लोंबत होत आणि एम. ए. ची सुरकी खाली टेबलावर आडवी पडली होती नंतर कधीतरी मीच ती बी. ए. वर फ्रेम करून टाकली.'' [१७] अशा पध्दतीने आमच्या संसारात मीच प्रत्येक गोष्ट उत्साहान कशी करत असे हे त्या वारंवार वर्णन करतात. एकूनच आयदान मध्ये लेखिका पुरुषांच्या बरोबर वागत असताना ते एका पुरुषसत्ताक व्यवस्थेचे प्रतिनिधी आहेत. हा दृष्टिकोन ठेवून वागते त्यांना माणूस म्हणून म्हणावी तितकी त्या किंमत देताना दिसत नाहीत.

# १६. सारांश

साहित्य आणि समाज यांचा संबंध अनन्यसाधारण असा आहे. या दोन्ही गोष्टींचा एकमेंकावर कायमपणाने प्रभाव पडलेला आपल्याला दिसून येतो. ते ते साहित्य हे त्या त्या विशिष्ट काळाचे व त्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे आपत्य असते. मनुप्रणित समाजव्यवस्था लेखकाच्या समाजाला विशिष्ट पध्दतीची वागणूक देत असते. इथली चातुर्वर्ण्य व्यवस्था माणसाचं माणूसपण नाकारते. या नकारामुळे अनेक अस्पृश्यांची आयुष्येच्या आयुष्ये पूर्णपणे उध्वस्त झाली आहेत. याच चित्रण आत्मकथनांच्यामध्ये येते. कोकण परिसरातील महार समाजाशी त्याच परिसरातील सवर्ण समाजाची अस्पृश्यतेची वागणुक कशी आहे. व हीच अस्पृश्यता लेखिका मुंबईला स्थाईक झाल्यानंतर ही तिला कशी भोगायला मिळते. याच चित्रण आयदानमध्ये प्रामुख्याने चित्रित झालेले आहे.

डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या प्रभावाने प्रेरीत होऊन दलित माणसात परिवर्तन झाले. तरीही इथल्या सवर्णांची मानसिकता जुनीच आहे. अजूनही त्यांना दलितपणाची वागणूक ते त्यांना देतात. याचे चित्रण आयदान मध्ये येत. दलितांना व्यापून उरलेल्या भुकेमुळे त्यांचे दारिद्रय वाढले. तसेच ही भुकच त्यांच्या प्रगतीतली फार मोठी धोंड कशी आहे. हे सर्व आत्मकथनांच्यात दिसते. तसे आयदानमध्येही दिसते. अस्पृश्यता प्रामुख्याने उघडपणे जाणवते ती ग्रामीण भागात, त्यामुळे ग्रामीण परिसराचे व ग्रामीण जीवनाचे चित्रण अपरिहार्यपणे सर्व आत्मकथनाच्यामध्ये येताना आपल्याला दिसते. लेखिका उर्मिला पवार यांनी ही फणसवळे नावाच्या रत्नागिरी जिल्ह्यातल्या एका खेडे गावाच्या परिसराचे वर्णन आयदान मध्ये केले आहे. आपल्या इथला माणूस किती ही दारिद्रयाने गांजला असला, भुकेने तडफडत असला

तरी आपल्या जातीचा खोटा अभिमान मिरवताना दिसतो. स्त्रियांचे अखंड शोषण होत असतानाही,सवर्ण समाजातील स्त्रिया दलित समाजातील स्त्रियांचे अस्पृश्यतेच्या नावाखाली शोषण करताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे इथल्या पुरुषसत्ताक कुटुंब व्यवस्थेबरोबरच जातीयताही फार मोठी गुन्हेगार असल्याचे चित्र आयदान मध्ये उर्मिला पवार यांनी चित्रीत केले आहे. परंतु काही पुरुषसत्ताक व्यवस्थेचे बळी म्हणून तो आपल्याशी जिव्हाळ्यात माणूसपणात वागणाऱ्या आपल्याच पुरुषांच्यात पाहून त्यांना विनाकारण दोष देत. त्यांच्यातील माणूसपणा पेक्षा पुरुषी गुणाकडे लक्ष केंद्रीत करुन दोषी ठरवतांना लेखिका दिसते.

दलित माणसांना रात्रंदिवस भोगाव्या लागणाऱ्या दु:खाचे, यातनांचे चित्रण आयदान्चा प्रमुख विषय आहे. दलित पुरुषांनी जे दु:ख भोगले ते दु:ख तर सार्वत्रिकत्तर आहेच. त्याचबरोबर दलिताहून ही दलित असणाऱ्या स्त्रीया या फार दु:खी आहेत. प्रत्येक गावा गावातील स्त्रिया, प्रत्येक समुहातील दलित स्त्रिला जे अतिम दु:ख भोगावे लागते त्याचे प्रातनिधीक रुपात चित्रण झाले आहे. ते आयदान मध्ये. म्हणून दलित स्त्रियांच्या जन्मोजन्मीचा दु:खाचा आलेख सर्वच दलित स्त्री आत्मकथन सांगतात. परंतु आयदान हे त्यापेक्षाही एक वरची पायरी गाठते व त्याच व्यवस्थे विरुध्द मग सुशिक्षित दलित स्त्री कशी झगडते याचे चित्रण आयदान मध्ये येत.

दलितांच्यावर पडलेला आंबेडकरी विचारांचा प्रभाव तसेच दलितामध्ये असणाऱ्या भुकेचे चित्रण स्त्रिजाणीवेच चित्रण तसेच ग्रामीण भागाचे चित्रण खेड्यात भोगावी लागणारी अस्पृश्यता खेड्यातील अशिक्षित अंधश्रध्देला बळी पडून त्याचे होणारे नुकसान या सगळ्याच चित्रणातील सार्वत्रिकता लेखीकेने आपल्या वेगळ्या निवेदन शैलीने नेमकेपणाने साधली आहे. म्हणून आयदान मधील प्रत्येक अनुभव समाजातील प्रत्येक दलित स्त्रीचा आहे. याच प्रत्यंतर येत.

## १७. निष्कर्ष

१) साहित्य हे विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे अपत्य असते, या तेन च्या विचारांचा पगडा या ना त्या स्वरूपात साहित्य कृतीवर कमी अधिक प्रमाणात पण सातत्याने पडत आलेला आहे.

२) आयदान मधील अनुभव विश्व एकट्या फणसवळे गावच्या विमलचे नसून त्या परिसरातील महार समाजातील स्त्रियांच्या जीवनाच चित्रण आहे.

३) धर्मांतरानंतर दलितांच्या जीवनात फार वेगाने परिवर्तन झाले. त्यांचे आचार-विचार राहणी सर्वच बदलली.

४) आयदान मध्ये भुकेने तडफडणाऱ्या व अपरिहार्यपणे गुलामगिरी स्वीकारावी लागलेल्या दलित लोकांचे चित्रण येते.

५) दलितांना जे विदारक दुःख भोगावं लागत त्यापेक्षाही जास्त दुःख दलित स्त्रियांना भोगावं लागत. हा मूलभूत प्रश्न घेऊन आयदान लिहिले गेले आहे.

६) स्त्री मुक्ती व स्त्री जाणीव यातून आलेली जागृती यातून आयदान च लेखन झालं आहे.

७) खेड्यातील लोकांच्या अंधःश्रध्दाळू मानसिकतेच चित्रण आयदान मध्ये येत.

८) दृश्य अस्पृश्यता व अदृश्य अस्पृश्यता यामुळे दलित माणूस कसा खचत आला आहे, याच चित्रण आयदान मध्ये येतं.

९) अस्पृश्यतेच्या शापित जीवनाबरोबरच आर्थिक दैन्य सांस्कृतिक, आर्थिक जीवन अनंत प्रश्नांनी व्यापून राहिले आहे. या सर्व प्रश्नांमुळे जे जीवन जगावे लागले त्या जाणिवा आयदान मधून प्रकट झाल्या आहेत.

१०) अनेक श्रध्दा अंधश्रध्दा व भोळ्या समजुती यामुळे कोकणातील महार समाज कसा वाईट स्थितीत जगतो आहे. याच चित्रण आयदान मध्ये लेखिका करते.

११) आयदान मध्ये येणार लैंगिक वर्णन अपरिहार्यपणे येते. कुठेही आक्रस्ताळेपणा किंवा कृत्रिमपणा या वर्णनात येत नाही. तर सहजपणे ही सगळी वर्णने येतात

१२) पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुध्द विद्रोह करताना लेखिका जीवनात येणाऱ्या प्रत्येक पुरुषांशी व्यवस्थेचा प्रतिनिधी म्हणूनच पाहते. एक माणूस म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करते.

## ● संदर्भ ग्रंथसूची


१) प्रा. गो. म. कुलकर्णी - मराठी साहित्यातील स्पंदने (१९६५)

सुपर्ण प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्रं. (३७)

२) उर्मिला पवार - आयदान ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. (२००३)

पृष्ठ क्रं. (२७१)

३) तत्रैव पृष्ठ क्रं. (४५)

४) तत्रैव पृष्ठ क्रं. (४४)

५) डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर - वेदनांचा प्रदेश, (१९९९)

कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. पृष्ठ क्रं. (४८)

६) उर्मिला पवार - आयदान (२००३)

ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. पृष्ठ क्रं. (६५)

७) डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर - वेदनांचा प्रदेश (१९९९)

कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. पृष्ठ क्रं. (३५)

८) उर्मिला पवार - आयदान (२००३)

ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

९) डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर - वेदनांचा प्रदेश (१९९९)

कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. पृष्ठ क्रं. (४२)

१०) उर्मिला पवार - आयदान (२००३)

ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. पृष्ठ क्रं. (२५)

११) तत्रैव पृष्ठ क्रं. ५

१२) डॉ. गंगाधर पानतवणे - 'ललित' जुलै २००४. पृष्ठ क्रं. (२२)

१३) उर्मिला पवार - आयदान (२००३)
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. पृष्ठ क्रं. (३३)

१४) डॉ. गिरीश काशिद - दलित नारी-संघर्ष की गाथा : आयदान
सं. तेजसिंह ( २००४) पृष्ठ क्रं. (८३)
अपेक्षा : अप्रैल जुन २००४ वर्ष - २ अंक - ७.

१५) डॉ. गंगाधर पानतवणे - 'ललित' जुलै २००४. पृष्ठ क्रं (२३)

१६) डॉ. विलास थोरात - अस्मितादर्श ( जा.फे.मा.) २००५
पृष्ठ क्रं. (४२)

१७) उर्मिला पवार - आयदान (२००३) पृष्ठ क्रं (८७)
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.